**डॉ. विनोद पाटील**
**प्रभारी कुलसचिव**

# मुंबई विद्यापीठ

कुलसचिवांचे कार्यालय,
महात्मा गांधी मार्ग,
फोर्ट, मुंबई – ४०० ०३२
ईमेल : registrar@fort.mu.ac.in

## परिपत्रक

**(अत्यंत महत्वाचे)**

No. REG/ICC/2020-21-14

**विषय :** महाराष्ट्र राज्यात Mission Begin Again या अंतर्गत मर्यादीत उपस्थीतच्या काळात महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीबाबत

**संदर्भ :** १. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीआयएसएम-१, दिनांक ३१ मे, २०२०.

२. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन,क्र. डीएमयु-२०२०/ सीआर-९२/डीआयएसएम-१, दिनांक ४ जून, २०२०.

३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: समय -२०२०/प्र.क्र.३५/१८(र.वका) दिनांक ४ मे, २०२०.

४. महाराष्ट शासन वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र. संकिर्ण१०२०२०/प्र.क्र.०१/सचिव (व्यय), दि. ५ जुन, २०२०

५. महाराष्ट शासन प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्र. समय २०२०/प्र.क्र३५/१८ (र.वका), दिनांक ५ जुन, २०२०.

६. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण कोकण विभाग, पनवेल, यांचे पत्र क्र. ससं/उशि/काविप/मशि-१/२०२०/६४५, दि. ६ जुन, २०२०.

७. विद्यापीठाचे परिपत्रक क्र REG/ICC/2020-21-09, दिनांक २ सप्टेंबर, २०२०.

८. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु-२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२०.

९. शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण २०२०/प्र.क्र.१७८/विशि-३ दिनांक २१ सप्टेंबर, २०२० उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

१०. शासन आदेश आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनर्वसन, क्र. डीएमयु/२०२०/सीआर-९२/डीआयएसएम—१, दिनांक ३० सप्टेंबर, २०२०.

कोव्हिड—१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या लॉकडाऊन काळात महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या महाविद्यालयातील व कार्यालयातील मर्यादीत उपस्थिती व शैक्षणिक कार्यालयीन कामकाजाबाबत विद्यापीठाने वेळोवेळी शासनाकडून प्राप्त सुचनांनुसार परीपत्रके / आदेश निर्गमित केलेले आहेत.

उपरोक्त संदर्भाधीन शासन आदेश क्र. १० नुसार Mission Begin Again अंतर्गत कोव्हिड—१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जारी केलेल्या टाळेबंदी (लॉकडाऊन) काळात महाविद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची महाविद्यालयातील/कार्यालयीन उपस्थिती मर्यादीत ठेवण्याबाबत शासनाकडून सूचना निर्गमीत करण्यात आल्या आहेत तसेच दिनांक ३१ ऑक्टोबंर, २०२० पर्यंत टाळेबंदी जाहिर करण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भाधींन क्रमांक ९ नुसार परीक्षा व परीक्षेच्या कामकाजाशी निगडीत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणार आहे. तथापि, सदर उपस्थिती ही ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष, जशी शक्य आहे त्या प्रमाणे आवश्कतेनुसार लागू राहिल. परीक्षा व परीक्षेशी संबधित कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून परीक्षा कामकाजासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीसंदर्भात विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक यांनी आपल्या स्तरावर आवश्यकतेनुसार योग्त ती कार्यवाही करावी, तसेच दिनांक ३१ ऑक्टोबंर, २०२० पर्यंत सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था बंद राहतील तथापी, ऑनलाईन शिक्षणासाठी परवानगी देण्यात आलेली आहे त्यानुसार सबंधित महाविद्यालये व संस्था यांनी योग्त ती कार्यवाही करावी.

विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील जिल्हयांमध्ये माननीय जिल्हाधिकारी यांनी प्रतिबंधित क्षेत्रासाठी व अप्रतिबंधित क्षेत्रासाठी जे आदेश निर्गमित केले असतील, त्यानुसार कार्यालयीन उपस्थिती बाबत योग्य ती कार्यवाही करावी.

वरील संदर्भीय शासन आदेश क्र ८ मधील ४ (iii) (a) नुसार महाविद्यालयांतील वर्ग १ व वर्ग २ संवर्गातील अधिकारी यांची १००% उपस्थीती अनिवार्य केलेली तसेच ४ (iii) (b) a. नुसार वर्ग ३ व वर्ग ४ संवर्गातील कर्मचा—यांची ३०% किंवा किमान ३० कर्मचारी यापैकी जे जास्त असेल त्या प्रमाणे आळीपाळीने कार्यालयीन उपस्थिती अनिवार्य केलेली आहे. तसेच ज्या कर्मचा—यांना कार्यालयात उपस्थितीत राहण्यापासून सुट मिळेल त्यांनी घरी राहून (Work From Home) या संकल्पनेद्वारे कार्यालयीन कामकाज करावे व जे कर्मचारी रजेवर आहे त्यांचा यात समावेश करु नये.

संदर्भ क्र ४ व ६ नुसार मर्यादीत उपस्थितीच्या काळात कार्यालयातील कर्मचा—यांच्या उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन आहरित करण्याबाबत शासनाकडून सुचना करण्यात आल्या आहेत त्यानुसार संलग्नित महाविद्यालयांच्या प्रचार्यांनी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उपस्थितीतबाबत आवश्यक त्या उपायायोजना कराव्यात.

प्रतिबंधित क्षेत्रात (Containment zone) रहिवास असणा—या शिक्षक/अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात कामकाजाकरीता बोलवू नये तसेच त्यांना घरी राहून (Work from Home) काम करण्याबाबत सुचना दयाव्यात.

वरील संदर्भीय शासन निर्णय / परिपत्रक नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/ मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक यांनी आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी, तसेच कोविड-१९ च्या व्यवस्थापनाबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळोवेळी प्रसिध्द् केलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अमंलबजावणी करावी.

तरी, सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक यांनी उपरोक्त बाबी आपल्या महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

**ठिकाण : मुंबई -४०००३२**
**दिनांक : ०४ ऑक्टोंबर, २०२०**

**(डॉ. विनोद पाटील)**
**प्रभारी कुलसचिव**

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी —**

१ मुंबई विद्यापीठाशी संलग्नित / संचलित विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक.

२ स्वीय सहाय्यक : १) कुलगुरु २) प्र—कुलगुरु ३) कुलसचिव ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ ५) वित्त व लेखा अधिकारी